विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक ३१/०३/२०२३

## पांढरकवडा शहरात पत्ता जुगार अडडयावर धाड टाकुन केला ८९,३३०/- रु चा मुददेमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळची कारवाई

यवतमाळ जिल्हयात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरु राहणार नाहीत तसेच अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन व्हावे याकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी त्यांचे अधिनस्त पथकांना अवैध धंदयाची गोपनिय माहीती काढुन प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या होत्या

दिनांक २९/०३/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक पो.स्टे. पांढरकवडा हददीत उघडकीस न आलेले गुन्हे तसेच अवैध धंदयाबाबत गोपणीय माहिती संबधाने पेट्रोलींग करीत असतांना गोपणीय माहिती मिळाली की, आठवडी बाजार पांढरकवडा येथे जिम्मी राय यांचे बंद दुकाणामध्ये काही इसम एक्का बादशाह नावाचा हारजीतचा जुगार खेळ खेळत आहेत अशी खात्रीलायक गोपणीय खबर प्राप्त झाल्याने खबरेचे गांभीर्य लक्षात घेवुन स्थागुशा कडील पथकाने तात्काळ पंचासह घटनास्थळी रवाना होवुन छापा कारवाई केली असता एक्का बादशाह नावाचा जुगार खेळ खेळणारे १) पराग चंदु राय वय २६ रा. शास्त्री वार्ड पांढरकवडा, २) अजिक्य उर्फ जिम्मी दिलीप परसोया (राय) वय ३२ वर्षे, रा. डि पी रोड पांढरकवडा, ३) गौतम चंदु सिडाम वय ४२ वर्ष, रा. आखाडा वार्ड पांढरकवडा, ४) मनोज विजय तारक वय २९ वर्षे, रा. पिंपरी ता. केळापुर, ५) रवि वामन कांबळे वय २८ वर्ष, रा. आखाडा वार्ड पांढरकवडा, ६) अजिक्य राजु लेदरे वय २८ वर्षे, रा. चंद्रशेखर वार्ड पांढरकवडा, असे मोक्यावर मिळुन आल्याने, घटनास्थळावर मिळुन आलेले गंजीपत्ते, नगदी रुपये तसेच आरोपीतांचे अंगझडतीमध्ये मिळुन आलेले नगदी ५२,३३० रुपये व ०३ मोबाईल असा एकुण ८९,३३०/- रु चा मुददेमाल जप्त करुन आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी व मुददेमाल पुढील कार्यवाही कामी पोलीस स्टेशनचे ताब्यात दिला आहे.

सदरची कारवाई ही वरिष्ठांचे मार्गदर्शनात सपोनि अमोल मुडे, पोहवा सुनिल खंडागळे, प्रशांत हेडाऊ, पोना सुधीर पांडे, निलेश निमकर, सुधिर पिदुरकर, पोकॉ रजनिकांत मडावी चालक पोना सतिष फुके सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

(शुभांगी गुल्हाणे)
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,यवतमाळ